# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.12.2024** **वारःमंगळवार**

---

1. मानवी हक्क दिनानिमित्त देशभरात आज विविध कार्यक्रम. दिल्लीत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संबोधित करणार.
2. पुढच्या तीन वर्षांमध्ये दोन लाख विमा सखी नेमण्याचं सरकारचं नियोजन असल्याची केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची माहिती.
3. नोईडा आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे दळणवळण वाढेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन. विमान धावपट्टीवर उतरवण्याची चाचणी यशस्वी.
4. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचं महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं प्रतिपादन आणि
5. माजी परराष्ट्रमंत्री आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस. एम. कृष्णा यांचं निधन

**<u>मानवी हक्क</u>**

आज मानवी हक्क दिन आहे. तत्कालीन संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत 1948 मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याच्या घटनेनिमित्त दर वर्षी दहा डिसेंबरला हा दिन साजरा करण्यात येतो. आपले हक्क, आपलं भविष्य, या क्षणी असं यंदाच्या मानवी हक्क दिनाचं ब्रीदवाक्य आहे. या दिनानिमित्त राष्ट्रीय मानवी हक्क आयोगानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संबोधित करणार आहेत. उद्घाटनानंतर मानसिक आरोग्याबाबत राष्ट्रीय परिषद होणार असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी देशात या वर्षी राष्ट्रीय लोक अदालतींमध्ये सात कोटी सत्तर लाख प्रकरणं निकाली काढली गेल्याचं म्हटलं आहे. मानवी हक्क दिनानिमित्त आकाशवाणीशी ते बोलत होते. देशात दर वर्षी तीन वेळा राष्ट्रीय लोक अदालती आयोजित केल्या जातात आणि अनेक वर्षांपासून थकीत असलेली प्रकरणं परस्पर सहमतीनं निकाली काढली जातात, अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>विमा सखी</u>**

पुढच्या तीन वर्षांमध्ये दोन लाख विमा सखी नेमण्याचं सरकारचं नियोजन असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. पानिपतमध्ये विमा सखी योजनेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. या वर्षी 25 हजार विमा सखी नेमल्या जातील, अशी माहिती त्यांनी दिली.  या योजनेत विमा एजंट म्हणून काम करणाऱ्या महिलांना पहिल्या वर्षी दरमहा सात हजार रुपये, दुसऱ्या वर्षी दरमहा सहा हजार रुपये आणि तिसऱ्या वर्षी पाच हजार रुपये इतकं मानधन दिलं जाईल, असं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल या योजनेचं उद्घाटन केलं. भारतीय जीवनविमा महामंडळ म्हणजे एलआयसीतर्फे ही योजना राबवली जात आहे.

**<u>नोईडा विमानतळ</u>**

नोईडा आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे दळणवळण वाढेल आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्र म्हणजे एनसीआर क्षेत्र आणि उत्तर प्रदेशातल्या लोकांचं जीवनमान सुकर होईल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आपलं सरकार जनतेला उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी अनेक पाऊलं उचलत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. नोईडा

आंतरराष्ट्रीय विमानतळाचं काम सध्या सुरू आहे. विमान धावपट्टीवर उतरण्याची पहिली चाचणी काल यशस्वी झाली. दिल्लीहून आलेलं विमान दुपारी धावपट्टीवर उतरलं. पाच मिनिटांच्या विश्रांतीनंतर त्याचं लगेच उड्डाण झालं. या विमानतळाचं 85 टक्के काम पूर्ण झालं आहे. त्याचं काम एप्रिलमध्ये पूर्ण होणार आहे. त्यांतर त्या विमानतळावरून रोज 65 विमानांचं उड्डाण होऊ शकणार आहे. प्रत्यक्ष सेवा सुरू झाल्यानंतर हे विमानतळ आशियातलं चौथं सर्वात मोठं विमानतळ असणार आहे.

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीत सहभागी होत असलेल्या युवा पिढीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या स्पर्धेत 13शे हून अधिक विद्यार्थी संघ सहभागी होतील. मुंबई पुण्यासाह देशातल्या 51 केंद्रांवर ही स्पर्धा होणार आहे. पुण्याच्या एमआयटी विद्यापीठामध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेच्या हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होणार आहे.

**राज्यपाल**

गेल्या आर्थिक वर्षामध्ये थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथम स्थानी होता, असं महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. राज्य विधान मंडळाच्या विशेष अधिवेशनामध्ये राज्यपालांनी काल विधीमंडळाच्या संयुक्त सभागृहाला संबोधित केलं. सध्याच्या 2024-25 या आर्थिक वर्षात एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीतही 1 लाख 13 हजार 236 कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणुक महाराष्ट्रात झाली आहे. ही गुंतवणूक, गेल्या वर्षाच्या थेट परकीय गुंतवणुकीच्या 90 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचं राज्यपाल म्हणाले. राज्य सरकार राबवत असलेल्या योजना, पायाभूत सुविधांचे प्रकल्प अशा मुद्दयाचा आढावा राज्यपालांनी आपल्या भाषणात घेतला.

**नार्वेकर**

राज्य विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात काल विधानसभा सदस्य ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी आवाजी मतदानानं निवड करण्यात आली. हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याचं जाहीर केलं. नार्वेकर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह सर्वपक्षीय सदस्यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन केलं.

अधिवेशनात काल 4 नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यपदाची शपथ देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरील विश्वासदर्शक ठराव काल विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधानपरिषदेच्या विशेष अधिवेशनाचं कामकाज काल संस्थगित करण्यात आलं. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या 16 डिसेंबरपासून नागपूरमध्ये होणार असल्याची घोषणा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

**युरोप-सिरिया स्थलांतर**

सिरियामधून आश्रय घेऊ इच्छिणाऱ्या सर्वांचे अर्ज युरोपीय राष्ट्रांनी प्रलंबित ठेवले आहेत. सिरियात बंडखोरांनी देशाचा ताबा घेतल्यानंतर अध्यक्ष बशर-अल-असाद यांनी पलायन केलं; त्यानंतर युरोपीय राष्ट्रांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सिरियामधल्या परिस्थितीवर आम्ही लक्ष ठेवून आहोत आणि तिथली राजकीय स्थिती स्पष्ट होईपर्यंत कोणताही निर्णय घेणार नसल्याचं जर्मनी आणि ब्रिटनकडून सांगण्यात आलं आहे. जर्मनीनं या वर्षी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सिरियातून आश्रय मागणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असून जर्मनीकडे आश्रय मागणाऱ्यांमध्ये एकट्या सिरियातून 72 हजारहून अधिक अर्ज आले आहेत.

**फिलिपाईन्स-ज्वालामुखी**

फिलिपाईन्समध्ये कानला(ऑ)न ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे सुमारे 87 हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. उद्रेक होण्याआधी सहा वेळा भूकंपाचे धक्के बसल्याचं आणि ज्वालामुखीचा लाव्हा सुमारे तीन हजार मीटर उंच उडल्याचं सांगण्यात आलं. या ज्वालामुखीची तीव्रता येत्या काही दिवसांत अधिक वाढण्याचा अंदाज भूवैज्ञानिकांनी वर्तवला आहे.

**<u>राजनाथसिंह दौरा</u>**

संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि रशियाचे संरक्षणमंत्री अँद्रे बेलुसोव्ह आज मॉस्कोमध्ये भारत-रशिया आंतर-सरकार लष्कर सहकार्य परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवणार आहेत. लष्करी सहकार्याशी संबंधित विविध मुद्द्यांचा दोन्ही मंत्री आढावा घेतील. विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांबाबतही चर्चा होणार आहे. राजनाथसिंह रविवारपासून रशियाच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

**<u>एस. एम. कृष्णा निधन</u>**

माजी परराष्ट्रमंत्री आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस. एम. कृष्णा यांचं काल मध्यरात्री प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. बंगळुरूमधील त्यांच्या निवासस्थानी मध्यरात्री पावणेतीनच्या सुमारास त्यांचं निधन झालं. त्यांना काही दिवसांपूर्वी रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर त्यांची प्रकृती खालावत गेली. एस. एम. कृष्णा कर्नाटकचे दहावे मुख्यमंत्री होते. 2009 ते 2012 या काळात ते परराष्ट्रमंत्री होते. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी 2004 ते 2008 या काळात काम पाहिलं होतं.

**<u>हॉकी</u>**

ओमानमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक महिलांच्या कनिष्ठ गटातील हॉकी स्पर्धांमध्ये भारतानं मलेशियाचा 5-0 पराभव करत आपली आगेकूच कायम ठेवली. दीपिकानं भारताकडून तीन गोल केले. भारताचा पुढचा सामना चीनबरोबर होणार आहे. आशिया चषक स्पर्धांमधले पहिले पाच संघ पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक हॉकी स्पर्धांसाठी पात्र ठरणार आहेत.

**<u>श्रवणदोष क्रिकेट</u>**

श्रवणदोष असलेल्यांसाठीच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत भारताच्या संघानं श्रीलंकेवर पाच-शून्य असं वर्चस्व राखलं आहे. दिल्लीमध्ये काल झालेल्या शेवटच्या थरारक सामन्यात भारताच्या संघानं तेरा धावांनी श्रीलंकेवर विजय मिळवला. संतोषकुमार या मालिकेत एकंदर 325 धावा नोंदवून सर्वोत्कृष्ट फलंदाज ठरला. बारा खेळाडू बाद करणारा श्रीलंकेचा ॲलनरोज कालेप मालिकावीर ठरला.

**<u>बीसीसीआय सचिव</u>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजे बीसीसीआयचे कार्यकारी सचिव म्हणून देवजित सैकिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी त्यांची नेमणूक केली. सध्याचे सचिव जय शहा यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाल्यामुळे सैकिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायमस्वरूपी सचिवांची नेमणूक होईपर्यंत सैकिया कार्यकारी सचिव म्हणून कार्यरत राहतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार